ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 10 + 8 + 8 = 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 7

Total No. of Questions : 10 + 8 + 8 = 26 ] [ Total No. of Printed Pages : 7

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 310-M (RS)**

**Code No. : 310-M (RS)**

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( LPS )
# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 07. 06. 2017 ]

Date : 07. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) ही प्रश्नपत्रिका 60 गुणांची आहे.

ii) प्रत्येक उत्तराचे चिंतन, संघटन करून या प्रश्नपत्रिके मधील उत्तरे लिहीण्यासाठी 3 तास अवधी दिलेला आहे.

iii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचने प्रमाणे लिहावे.

**भाग - I**

I. या भागात एकूण **10** प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाला **4** पर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडा : 10 × 1 = 10

1. असमानता असलेल्या आजच्या समाजात शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक समाजाला आपापसात जोडले पाहिजेत. ही व्याख्या करणारी संस्था

(अ) युनिसेफ

(आ) यु० एन० ओ०

(इ) यु० एन० डी० पी०

(ई) युनेस्को.

2. मौखिक अभिव्यक्ती म्हणजे हे होय

(अ) खेळणे

(आ) सांगितलेले ऐकणे

(इ) बोलणे

(ई) समजावून घेणे.

3. कांही मुले शाळत बोलताना घाबरतात. कारण

(अ) भितीमुळे

(आ) आनंदी असल्यामुळे

(इ) उत्साही असल्यामुळे

(ई) प्रेमामुळे.

4. मुलाला घरची भाषा शिकण्याचे साधन

(अ) खेळ

(आ) घरच्या लोकांचे अनुकरण

(इ) रडण्याद्वारे आपली आवश्यकता इतरांना सांगणे

(ई) थोरांचे मार्गदर्शन.

5. वाचन व लेखन कौशल्यात मुलांना केव्हा गुंतवून ठेवणे योग्य होईल ?

(अ) लेखन कौशल्यात अभिवृद्धी झाल्यानंतर

(आ) श्रवण कौशल्यात अभिवृद्धी साधल्यावर

(इ) वाचन कौशल्यात अभिवृद्धी साधल्यावर

(ई) मौखिक ( भाषण ) कौशल्यात अभिवृद्धी साधल्यावर.

6. भाषेची ग्रहणात्मक उद्दिष्टे ही आहेत.

(अ) वाचन व लेखन

(आ) श्रवण व भाषण

(इ) वाचन व श्रवण

(ई) लेखन व भाषण.

7. भाषा विकासाची कौशल्ये इतकी आहेत.

(अ) तीन

(आ) चार

(इ) दोन

(ई) पाच.

8. उच्चारातील दोष नाहीसे करण्यासाठी

(अ) मुलांना बोलण्यास अधिक संधी दिली पाहिजे

(आ) मुलांना अधिक लिहीण्यास संधी दिली पाहिजे

(इ) मुलांना वाचन करण्यास अधिक संधी दिली पाहिजे

(ई) मुलांना अधिक श्रवण करण्यास संधी दिली पाहिजे.

9. मंदगतीने शिकणाऱ्या मुलांना

(अ) शब्दांच्या माध्यमातून वर्णन करून शिकविले पाहिजे

(आ) विविध शैक्षणिक साहित्य वापरून शिकविले पाहिजे

(इ) शब्दांवर जोर देवून शिकविले पाहिजे

(ई) वर्गातील इतर मुलांच्या प्रमाणेच शिकविले पाहिजे.

10. प्राथमिक शिक्षणाला येथून खरी सुरवात होते.

(अ) 5 वी पासून

(आ) बालवाडीपासून

(इ) 1 ली पासून

(ई) 2 री पासून.

## भाग - II

II. या भागात एकूण **8** प्रश्न दिलेले आहेत. त्यापैकी कोणत्याही **5** प्रश्नांची उत्तरे लिहा. ( प्रत्येक प्रश्नाला **2** गुण ) : 5 × 2 = 10

1. श्रावणमासी हर्ष मानसी,

   ...............................

   ...............................

   ................................

   या ओळी पूर्ण करा.

2. माता आणि मातृभूमी यांच्या पंक्तीतच मातृभाषेला महत्व आहे. तुमचे मत मांडा.

3. मौखिक संभाषणात खेळाची भूमिका सांगा.

4. प्रकट वाचन आणि मौनवाचन यामधील दोन फरक सांगा.

5. मुलांच्या वाचन क्षमतेतील उणिवा दूर करण्यासाठी शिक्षकांने कोणत्या सवयी लावणे गरजेचे आहे ?

6. साक्षरता म्हणजे काय ?

7. अनुलेखन कशाला म्हणतात ?

8. मंदगतीने शिकणाऱ्या मुलांना शैक्षणिक साहित्य वापरून शिकविले पाहिजे. दोन कारणे सांगा.

## भाग - III

III. या भागात आठ प्रश्नांची उत्तरे लिहीली पाहिजेत. प्रत्येक प्रश्नात **अ** आणि **आ** असे दोन प्रश्न दिलेले आहेत. त्यापैकी कोणताही एक प्रश्न लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर कमीत कमी एक पान असावे. ( प्रत्येक प्रश्नाला 5 गुण ) : 8 × 5 = 40

1. अ) ऐकणे आणि श्रवण करणे यातील फरक सांगून, श्रवण करण्याच्या पद्धती स्पष्ट करा.

**किंवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने मुलांच्याकडून कथा सांगून घेण्यास कोणती पूर्व तयारी कराल ?

2. अ) मुले कोणत्या श्रवण सामर्थ्य पायरीत आहेत. त्यांना कोणत्या प्रकारच मार्गदर्शन केले पाहिजेत हे सांगून घेण्यास विविध श्रवण सामर्थ्यांची यादी करा.

**किंवा**

आ) श्रवण आणि संभाषण यांचा संबंध स्पष्ट करा.

3. अ) भाषा आणि समाज यांचा संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुलांच्या वाचनाचो पूर्व सिद्धता करुन घ्यावयाचे विविध मुद्दे सांगुन, त्यातोल कोणत्याही दोन मुद्यांचे स्पष्टीकरण करा.

4. अ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने वाचनास अनुकूल अशा विविध कृती सांगून त्यातील कोणत्याही दोन कृती स्पष्ट करा.

**किंवा**

आ) तुम्ही मुलांच्याकडून कॉपी ( नक्कल ) लेखनाचा सराव कसा करुन घ्याल ?

5. अ) तुम्ही शिक्षक या नात्याने, नुकत्याच प्रवेश घेतलेल्या मुलाला शाळेच्या भाषेत जमवून घेण्यास कोणत प्रयत्न कराल ?

**किंवा**

आ) मुलाच्या वाचनातील समस्येबाबत घरचो पार्श्वभूमी सांगून, तुम्ही समस्या सोडविण्यास वर्गात कोणती अनुकूलता निर्माण कराल ?

6. अ) नली-कली वर्ग प्रक्रियेचे कोष्टक काढून त्याची प्रक्रिया धोडक्यात स्पष्ट करा.

**किंवा**

आ) प्रारंभिक साक्षरतेच्या विविध व्याख्या सांगून त्याचा अर्थ स्पष्ट करा.

7. अ) खालील कवितेचा अर्थ सांगा –

**सूर्योदय**

बघ आई आकाशात सूर्य हा आला
पांघरून अंगावर भरजरो शेला
निळ्या त्याच्या महालाला खांब सोनेरी
मोतियाच्या लावियेल्या आतत झालरी
केशराचे घातले हे सडे भुवरी
त्यावरूनी येई त्याची डौलाने स्वारी
डोंगराच्या आडून हा डोकावी हळू
आणि फुल गुलाबाची लागे उधळू
नभातून सोमियाच्या ओतीतो राशी
गुदगुल्या करीत तो खेळे फुलाशी
पाखराच्या संगे याची सोबत छान
गती बघ कशी याला गोड गायन
मंद वारा जागवितो साऱ्या जागाला
म्हणसे उठा उठा मित्र हा आला.

**किंवा**

आ) तुमच्या शाळेच्या परिसरात गटारीचे पाणी साचून दुर्गंधी निर्माण झाली आहे. तेव्हा संबंधित अधिकाऱ्याला तुम्ही एक विनंती पत्र लिहा.

8. अ) समावेशक वर्गासाठी शिक्षकांने करावयाची अध्यापनाची तयारी स्पष्ट करा.

**किंवा**

आ) समावेशक वर्गात संभाषणातील दोष आणि दृष्टीदोष असणाऱ्या मुळांसाठी कोणते अध्ययन मार्ग अवलंबावेत ? स्पष्ट करा.